# बीड शहरात उघड झाला जातीवादाचा चेहरा; अण्णाभाऊ साठे जयंतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या आ.संदिप क्षीरसागरांवर सवालांची सरबत्ती?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३१३ ■ गुरूवार दि.३१ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 313 ■ Thursday Dt. 31 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# आमदार महोदय, शिवजयंती साजरी करावीच ...पण अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या थोर क्रांतिकारकांची आठवण ठेवली गेली पाहिजे?

## शिवजयंतीला लाखोंचा गाजावाजा, अण्णाभाऊ साठे जयंतीकडे दुर्लक्ष; मातंग समाजात नाराजीचा सूर?



**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात सध्या राजकीय व सामाजिक वर्तुळात एकच चर्चा रंगली आहे. शिवजयंतीला लाखों रुपये खर्च करणारे आमदार संदीप क्षीरसागर यांना लोकशाही प्रतीक अण्णाभाऊ साठे यांची जयंती आठवत नाही का? सामाजिक न्यायासाठी आयुष्य वेचणारे आणि वंचित, शोषित, मागासवर्गीयांसाठी क्रांतिकारी लेखणी चालवणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी साजरी केली जाते. मात्र, बीड शहरात त्यानिमित्त कोणतेही कार्यक्रम, सरकारी पातळीवरील आयोजन अथवा आमदारांच्या वतीने कुठलीही पुढाकाराची भूमिका दिसून आली नाही, यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.**

शिवजयंतीच्या नावाखाली लाखोंचा खर्च करणारे आमदार क्षीरसागर, समाजासाठी संघर्ष करणाऱ्या अण्णाभाऊंना विसरतात का?, असा थेट सवाल आता सामाजिक कार्यकर्ते व युवावर्ग विचारत आहेत. ज्यांच्या विचारांनी लाखोंना प्रेरणा मिळते, अशा अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीकडे राजकीय मंडळींकडून होणारे हे दुर्लक्ष म्हणजे एक प्रकारचा राजकीय व सामाजिक भेदभाव असल्याचे आरोप होत आहेत. दरम्यान, काही युवक संघटनांनी व समाजप्रेमींनी स्वखर्चाने अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याचे ठरवले असून, आम्ही नायकांची आठवण ठेवतो, ना की केवळ प्रसिद्धीची अशा शब्दांत त्यांनी आपली भावना व्यक्त केली आहे.

राजकीय पोसाखातील जातीवादाचा चेहरा आता उघड होत असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमध्ये बळावत आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आमदार संदीप क्षीरसागर यांची उदासीनता आणि निवडक कार्यक्रमांवरच भर या मुद्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



शिवजयंतीच्या वेळी प्रचंड रोषणाई, रथयात्रा, भव्य स्टेज आणि पोस्टरबाजी करणारे आमदार क्षीरसागर, मात्र अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीसाठी एकही पोस्टर, निवेदन वा साधा कार्यक्रमही करत नाहीत. ही गोष्ट सामान्य जनतेच्या लक्षात आली असून, त्यामुळे हे निव्वळ प्रसिद्धी आणि राजकीय गणितासाठी जयंती साजऱ्या होतात का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचे महान नेतृत्व. त्यांच्या विचारांमुळे आज हजारो तरुण शिक्षणाच्या प्रवाहात आले. मात्र, त्यांच्या जयंतीकडे सरकारी आणि राजकीय पातळीवर दुर्लक्ष होत असलेले चित्र खऱ्या समाजनायकांची आठवण ठेवणाऱ्यांची कमतरता दाखवते. शिवजयंती साजरी करावीच, पण अण्णाभाऊंसारख्या थोर क्रांतिकारकांची आठवण ठेवली गेली पाहिजे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. बीड शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी हे स्पष्टपणे म्हटले की, जात पाहून जयंती साजरी केली जाते, तर ते लोकशाहीच्या विरोधात आहे. यासंदर्भात आमदार संदीप क्षीरसागरांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी सोशल मीडियावरून मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे.

## बीड जिल्ह्यातील विजेच्या प्रलंबित कामांसाठी महत्त्वपूर्ण आढावा बैठक



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध वीज प्रलंबित कामांवर तोडगा काढण्यासाठी ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत आमदार नमिता मुंदडा यांनी केज विधानसभा मतदारसंघातील वीज प्रश्नांबाबत ठोस भूमिका मांडत अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या.

आ. मुंदडा यांनी आरडीएसएस योजनेअंतर्गत केज मतदारसंघात नवीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्याची, जुन्या उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसवण्याची आणि कृषी वाहिन्यांवरील ओव्हरलोड कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात ६३ केव्हीए व १०० केव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसवण्याची जोरदार मागणी केली. तसेच, केज शहरासह ग्रामीण भागातील उच्चदाब व निम्नदाब लाईनचे पोल आणि तारा निकृष्ट अवस्थेत असल्याने त्यांचे तातडीने बदल करावेत, अशीही आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

सौर कृषी वाहिनीअंतर्गत सुरू असलेली अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, रिक्त अभियंता पदे भरण्यात यावीत, अशी ठोस भूमिका त्यांनी मांडली. कोरेगावसारख्या गावांचा आरडीएसएस योजनेत समावेश करून नवीन ११ केव्ही लाईन मंजूर करण्याची, विविध उपकेंद्रांवर आयसोलेटर बसवण्याची, ट्रान्सफॉर्मर ऑईल आणि नव्या ट्रान्सफॉर्मरची उपलब्धता सुनिश्चित करण्याची मागणीही त्यांनी केली. वाघाळा, आडस, पाथरा येथे १३२ केव्ही

पान ३ वर



## अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने बीड शहर पोलिस स्टेशनमध्ये रक्तदान शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अनुषंगाने बीड शहर पोलीस स्टेशन येथे काल रक्तदान शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ३१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांनी रक्तदान केले. त्यांच्यासोबत बीड शहर चे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि इतर अधिकारी आणि अंमलदार यांनी सुद्धा रक्तदान केले.

याप्रसंगी बोलताना श्री नवनीत काँवत त्यांनी सांगितले की, थोर पुरुषांच्या जयंती साजरी करत असताना सर्वांनीच लोकाभिमुख उपक्रम राबवणे गरजेचे आहे. आपण बऱ्याचदा थोर पुरुषांचे जयंती उत्सव राबवत असताना आपण सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेपासून दूर जात आहोत. थोर पुरुषांची शिकवण आपण विसरत चाललो आहोत असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच याप्रसंगी त्यांनी सांगितले की, लोकांनी स्वतःहून पोलिसांना समाजात काही चुकीची घडत असलं त्याची माहिती द्यायला पाहिजे जेणेकरून पोलिसांना त्यावर चांगले काम करता येईल. याप्रसंगी सहभागी झालेल्या लोकांचे कौतुक करून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात पोलीस स्टेशन बीड शहर च्या ११ अंमलदार यांनी रक्त दान केले तसेच या रक्तदान कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभाग नोंदवला.




# १ ऑगस्ट : इतिहास, संस्कृती आणि स्वाभिमान यांचा संगम अण्णाभाऊ साठे यांची जयंती : एक स्मरण आणि महसूल दिन

इतिहासात काही दिवस असे असतात की ज्यांचे महत्त्व एखाद्या घटनेपुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण विचारप्रवाह, चळवळ आणि समाजमनाचे प्रतिबिंब बनतात. १ ऑगस्ट हा तसा दिवस! एका क्रांतिकारक साहित्यिकाचा जन्मदिवस, शासकीय यंत्रणेतील एक अत्यंत महत्वाचा विभागाचा गौरवदिन आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा निर्णायक टप्पा. या एका तारखेत तीन वेगळ्या वाटा आपापल्या दिशेने सुरू झालेल्या असूनही, त्या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे. सामान्य माणसाचं जीवन अधिक न्याय्य, स्वाभिमानी आणि सन्मानित करण.





**लेखणीतून उठलेला आवाज : अण्णाभाऊ साठे**

१९२० च्या याच दिवशी, पुण्याच्या वद्रू बुद्रुक गावात एका वंचित कुटुंबात जन्म झाला, एका अशा व्यक्तीचा, ज्याने पुढे भारतीय साहित्यविश्वाला एक नवा मार्ग दाखवला. अण्णाभाऊ साठे – एक व्यक्ती नव्हे, तर चळवळ होती. शिक्षणाच्या संधीपासून वंचित, पण वास्तवाच्या भाषेत लिहिणारी त्यांची लेखणी ही लाखो श्रमिक, दलित आणि वंचितांच्या वेदनांची समर्थ साक्ष होती. अनुभवाच्या विद्यापीठातून शिकलेल्या अण्णाभाऊंनी लेखणी हातात घेतली आणि एक समाजजागृतीचा वणवा पेटवला. त्यांच्या कादंबऱ्या, कथा, तमाशे हे सर्व केवळ कलाकृती नव्हत्या, तर त्या काळातील व्यवस्थेवर केलेले तीव्र भाष्य होते. 'फकीरा' या त्यांच्या अजरामर कादंबरीतून ज्या बंडखोरतेचा आवाज उमटतो, तो केवळ साहित्यात नव्हे तर समाजमनातही गाजतो. अण्णाभाऊंचा विद्रोह ही अराजकतेची हाक नव्हती, तर तो एका समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी होता. त्यांनी लोककलेसारख्या तमाशाला केवळ करमणुकीपुरते मर्यादित न ठेवता, ते समाजजागृतीचं शस्त्र बनवलं. त्यांच्या लेखणीचा प्रवास हा माणसाच्या आत्मसन्मानाचा प्रवास ठरतो तो आजही अपूर्ण आहे, पण सुरु आहे. अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांची ही ज्योत नव्या पिढीपर्यंत पोचवण्याचे आपले कर्तव्य आहे.

**महसूल सेवा : शासन आणि जनतेमधील नात्याचा पूल**

अण्णाभाऊंच्या जयंतीच्या दिवशीच महसूल दिन साजरा होतो. पहिल्या दृष्टीक्षेपात ही शासकीय कार्यक्रमाची चौकट वाटू शकते. पण जर आपण थोडं खोलात पाहिल, तर महसूल विभाग म्हणजे शासनाची एक अशी रचना आहे जी सर्वसामान्य नागरिकाच्या सर्वात जवळ उभी आहे. प्रशासनातील महसूल विभाग म्हणजे ग्रामीण भारताच्या मूलभूत प्रश्नांशी झगडणारा आणि ते सुटावेत म्हणून सतत झटणारा विभाग. गावातील शेतकरी जर आपल्या सातबाऱ्याच्या उताऱ्यावर विश्वास ठेवतो, तर तो महसूल यंत्रणेवर ठेवलेला विश्वास असतो. नकाशे, फेरफार, खरेदी-विक्री, जमिनीचे हक्क, नोंदणी, आपत्ती मूल्यांकन या सर्व प्रक्रियांच्या मागे महसूल कर्मचाऱ्यांची मेहनत असते. आणि ही मेहनत ही केवळ फाईल आणि सहीपुरती मर्यादित नसते. एखाद्या नैसर्गिक आपत्तीमध्ये गाव जलमय झालं की पावसात, चिखलात, पहिल्यांदा पोहोचणारा तलाठी असतो. नुकसानमापन करणारा मंडळ अधिकारी असतो. संकटात जनतेसाठी धावणारा तहसीलदार असतो. ही लोक फक्त सरकारी कर्मचारी नाहीत ते संकटात तुमचे पहिले आधारस्तंभ असतात. या विभागाची परंपराही जुनी आहे. ब्रिटिश कालखंडात सुरुवात झालेली ही यंत्रणा, स्वातंत्र्यानंतर अधिक जनाभिमुख झाली. अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महसूल व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि प्रभावी झालं आहे. डिजिटल सातबारा, ऑनलाईन फेरफार नोंदणी, भूमी अभिलेख संगणकीकरण... हे सगळं आज गावातील सामान्य माणसालाही स्पर्श करू लागलं आहे. महसूल दिन म्हणजे केवळ प्रशासकीय कार्यालयाचा उत्सव नव्हे तर शासन आणि जनतेतील नातं दृढ करणाऱ्या कामगिरीचं स्मरण आहे.

**असहकार चळवळ : स्वराज्याच्या स्वाभिमानी बीजांची पेरणी**


१९२० सालीच, १ ऑगस्ट रोजीच, महात्मा गांधींनी असहकार चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक टप्पा नव्हता. ती एक मूल्यनिष्ठ चळवळ होती. त्यावेळी जालियनवाला बागचा अत्याचार, रौलट कायद्याचा अन्याय, ब्रिटिशांच्या सत्तेचा अंधेर या सर्वांचा रोष भारतीय जनतेत खदखदत होता. गांधीजींनी याच जनभावनेला शांततामय मार्ग दिला. त्यांनी विदेशी वस्त्रांवर बहिष्कार टाकायला सांगितल, सरकारी शिक्षण संस्था, न्यायालय यांचा त्याग करायला सांगितला. स्वदेशी ही केवळ आर्थिक संकल्पना नव्हती, ती मानसिक गुलामीपासून मुक्त होण्याची घोषणा होती. संपूर्ण देशभर असहकाराची लाट पसरली. ग्रामीण भारतात शेतकरी जागा झाला, शहरी भारतात विद्यार्थी आणि वकील रस्त्यावर उतरले. महिलांनीही यात मोठ्या प्रमाणात भाग घेतला. ही चळवळ हळूहळू स्वराज्य या संकल्पनेचं बिंब बनली. आजप, शतक उलटून गेले तरी असहकार चळवळीचा संदेश कालबाह्य झालेला नाही. अन्यायाविरुद्ध उभं राहण, तेही अहिंसेच्या मार्गाने ही कल्पना आजही आपल्याला वाट दाखवते. संविधानिक मार्गाने लढण, जनतेचा जबाबदार सहभाग, लोकशाही मूल्यांचं रक्षण या गोष्टी फक्त घोषवाक्य म्हणून नव्हे, तर कृतीत उतराव्यात लागतात.



१ ऑगस्ट हा दिवस आपल्याला तीन वेगवेगळ्या वाटांनी एकच गोष्ट सांगतो. सामान्य माणूसच खरा नायक आहे अण्णाभाऊ साठे यांची साहित्यिक क्रांती, महसूल अधिकाऱ्यांची नि:स्वार्थ सेवा आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलनातील जनतेचा सहभाग हे सर्व त्या सामान्य माणसाच्याच स्वाभिमानाचे विविध रूप आहेत. या तीन घटनांचा एकत्रित अर्थ असा की, देशाच्या उभारणीसाठी केवळ लढणं पुरेस नाही, तर समाजाला समजून घेणं आणि सक्षम करणंही तितकच आवश्यक आहे. आपण या दिवशी कोणत्याही एका घटनेकडे पाहून उत्सव साजरे करू शकतो. पण जर आपण या तिन्ही घटनांकडे एकत्र पाहिल, तर आपल्याला एक मोठ चित्र दिसतं. सामान्य माणसाच्या अधिकारांच, संधींच आणि न्यायाच! हे दिवस केवळ स्मरणाचे नसावेत; ते प्रेरणेचे, आत्मपरीक्षणाचे आणि कृतीचे असावेत.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
तहसीलदार, बीड

# शोषित, कामगार, गोरगरिबांचे वास्तविक दुःख आपल्या लेखनातून जगासमोर मांडणारे विद्यापीठ म्हणजे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



साहित्य क्षेत्रात भरीव असं मोलाचं योगदान साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच आहे, यात तिळ मात्र शंका नाही. भाऊंनी साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे महाराष्ट्रबरोबर संबंध भारत देशाचा नावलौकिक झाला. इतर देशातही भाऊंच्या लेखनाचा आणि कलेचा ठसा उमटत गेला. खास करून रशियामध्ये, अण्णाभाऊच्या कादंबऱ्या रशियाच्या भाषेत अनुवादित झाल्या होत्या, त्या संबंधित अण्णाभाऊ साठे यांनी रशियाला दौरा काढला होता.

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म दि.०१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या एका खेडेगावात झाला. एका दलित कुटुंबात त्यांचा जन्म झाला. दलित असल्यामुळे त्यांना सुरवातीपासून खूप चटके सहन करावे लागले. भाऊंचे पूर्ण नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते. अण्णाभाऊ साठे यांच्या शिक्षणाबद्दल सांगायचे झाले तर त्यांनी बरेच शिक्षण हे स्वतःहून घेतले कारण शाळेत ते फक्त दीड दिवसच गेले होते. उर्वरित शिक्षण आहे त्यांनी मुंबईमध्ये राहून रोडवरील दुकानावरील पाट्या वाचून आणि घरीच शिकले. असे असतानाही त्यांनी आणि कथा, पोवाडे, कादंबऱ्या, संगीत स्वतःहून साहित्य क्षेत्रात लिहिले म्हणूनच त्यांना साहित्याचा सम्राट असे संबोधले जाते. भाऊंच्या लिहिण्याचे एक वैशिष्ट्य होते ती म्हणजे त्यांचं सत्य घटनेवर आधारित लेखन, आणि गोरगरीब, शोषित, कामगार यांच्या व्यथा जगासमोर मांडणे. माझ्या मते पाठ्यपुस्तकामध्ये अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेले वास्तविक सत्य घटनेवर आधारित लेखन आभ्यासक्रमात पाहिजे. त्यांच्या मते कामगाराच्या हातावरची पृथ्वीत उतरलेली आहे. घोषवाक्य आहे ही पृथ्वी विशेष नागाच्या मस्तकावर चाललेली नसून, कष्टकरी आणि गोरगरीब जनतेच्या हातावर काढलेली आहे.



मुंबई आणि अण्णाभाऊ साठे यांचे अतुट नात आहे. कारण बराच काळ अण्णाभाऊंचा मुंबई येथे गेला. त्यांच्या क्रांतीची खरी सुरुवात मुंबई येथूनच झाली. कोणतेही शस्त्र न वापरता भाऊंनी समाजव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले त्यांचे शब्दच शस्त्रापेक्षा धारदार होते. मुंबई येथे राहून त्यांनी खूप कष्टाची कामे केली. काम करता करता त्यांनी लेखनही करायचे. कामगारांचा कष्टकऱ्यांच त्यांनी एक संघटन तयार केले, त्यामधून ते त्यांच्या ने हक्कासाठी मोर्चे, आंदोलन, उपोषणे करायचे न्याय मिळवून द्यायचे त्यामुळे हळूहळू त्यांचा कामगाराची नेते म्हणून असा उल्लेख केला जायचा. त्यांच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव होता तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याही विचाराचा प्रभाव होता. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे गुरु होते. त्यांच्या मार्गावर ते चालत. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार तळागाळात पोहोचवण्याचे कार्य केले. आंबेडकर चळवळ रुजवली, संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा खूप मोठा मोलाचा वाटा आहे त्यांनी आपले लेखनाद्वारे संयुक्त महाराष्ट्र हे चळवळ जिवंत ठेवली म्हणून ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आग्रगनी नेते म्हणून ओळखले जायचे. आज मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचं थोडफार श्रेय अण्णाभाऊ साठे यांना जातं. कारण भाषेचा प्रसार मराठी भाषेमध्ये लेखन, ती रूजवण्यासाठी टिकवण्यासाठी केलेले प्रयत्न, महामानवाची आज जयंती लोककवी साहित्यसम्राट समाज सुधारक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी प्रणाम...

**लेखक: कपिल आवाड**
युवा नेते मा.ह.अभियान, मो.७४४७४९३६७४

# आंबेडकरी विचारांच्या परिप्रेक्ष्यात ; अण्णाभाऊ साठे अण्णाभाऊंच्या जीवनात आंबेडकरी वळण

खरेतर अण्णाभाऊ साठे हे साम्यवादी (कम्युनिस्ट) असल्याचे टिपुरे वाजविले जाते. परंतु भारतातला वर्णवाद कायमचा मिटविण्यासाठी मार्क्सवाद अपुरा आहे याची प्रचिती अण्णाभाऊंना १९५२ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत आली.! ज्या मतदारसंघातून बाबासाहेब उभे राहिले होते त्याच मतदारसंघात बाबासाहेबांच्या विरोधात कम्युनिस्टांनी प्रचार जोरात केला. इतकेच नव्हे तर कॉम्रेड डांगे बाबासाहेबांच्या विरोधात उभे राहिले. त्यावेळी काँग्रेस पक्षाने ठाम भूमिका घेतली की भलेही आमच्या उमेदवाराला मत द्यायचे नसेल तर देऊ नका परंतु ते मत डांगेंना द्या नाहीतर मत कुजवा. यातून हे स्पष्ट होते की काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष हे बाबासाहेबांच्या पराभवासाठी एकवटले होते. म्हणून अण्णाभाऊ कम्युनिस्टांच्या प्रचारालाही जाण्याचे टाळत असे. (बाबासाहेबांचा मतदार संघ वगळता इतर ठिकाणी अण्णाभाऊंनी कम्युनिस्टांचा प्रचार केला, कारण त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र नव्हता तर मुंबई प्रांत अस्तित्वात होता.) अण्णाभाऊ हे जेव्हा मुंबईत आले तेव्हा ते काही मोजक्या लोकांच्या सभेला जात असत त्यातील आंबेडकर, डांगे, नेहरू, व स्वातंत्र्य मिळावे म्हणून केलेले आंदोलने-मोर्चे. अण्णाभाऊ प्रामुख्याने बाबासाहेब व कम्युनिस्ट यांच्या सभेला हजर असायचे. अण्णाभाऊ बाबासाहेबांना बघत आले होते. त्यांचे भाषणे नि विचार आणि त्यांचे लिखाण जनता नंतरचे प्रबुद्ध भारत, नवाकाळ, अत्रेंचे मराठा, नवयुग इत्यादी वर्तमानपत्रातून वाचत असे. अण्णाभाऊ अशा काळात जन्मले जिथे नवयुग आकार घेऊ लागलं होतं. टिळक पर्वाचे अस्त होऊन गांधीयुग सुरू झाले होते आणि त्यालाच समांतर असे आंबेडकर युगही. एकीकडे गांधी पारतंत्र्यात खितपत पडलेल्या भारत भूमीला राजकीय हक्कांची प्राप्ती व्हावी, म्हणून ब्रिटिशांसोबत झगडत होते. तर दुसरीकडे हजारो वर्षाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय गोष्टींची बंधने शिरसावंद्य मानून, देशोधडीला लागलेले व विषमतेने लादलेल्या व्यवस्थेचे दास म्हणून जगत आलेल्या समूहाला आत्मभान मिळावे याकरिता जीवाच्या आकांताने बाबासाहेब लढत होते.! प्रारंभी अण्णाभाऊंवर मार्क्स, लेनिन व गॉर्की यांचा प्रभाव पडला होता. तसं पाहिलं तर रशियाने अण्णाभाऊंना भारताचा मॅक्झिम गॉर्की म्हणून गौरविले आहे. पण अण्णाभाऊंचे समग्र जीवन पाहता ते गॉर्की पेक्षाही थोर वाटतात. १९५२ च्या निवडणुकीत अण्णाभाऊंना कम्युनिस्टांची चाल समजली व हा मार्क्स व त्याचे तत्वज्ञान भारताच्या काहीच कामी येणार नाही असे त्यांना ज्ञात झाले. कारण रशिया प्रमाणे ही भारतात क्रांती घडावी असे अण्णाभाऊंचे मत होते, पण इथला कामगार वर्ग हा मुख्यतः दलित आहे. व तो वर्षानुवर्ष विषमतेच्या खाईत लोटला गेला आहे हे वास्तव जगाचे चित्रण अण्णाभाऊंना समजले.! व्यवस्थेचे मर्दन करायचे असेल तर जगाचा दृष्टिकोन आपल्याला बदलावा लागेल. असे ठाम मत अण्णाभाऊंनी व्यक्त केले, बाबासाहेबांनी केलेल्या अभूतपूर्व धम्मक्रांतीमुळे अण्णाभाऊ खूप भारावून गेले होते. याची साक्ष शाहीर अमर शेख यांनी अण्णाभाऊंच्या देशभक्त घोटाळे या लोकनाट्याच्या पुस्तकाला दिलेल्या प्रस्तावनेत दिसते. याच लोकनाट्यात अण्णाभाऊंनी




फकड्या नावाच्या मुख्य नायकाच्या तोंडी जग बदल घालुनी घाव., सांगून गेले मला भिमराव हे कवन दिले. अण्णाभाऊंनी बाबासाहेब वाचले होते, तसेच मार्क्स आंबेडकर या विषयावर त्यांचे अध्ययन ही झाले होते. दोघांच्याही विचारांचे परीक्षण करून हे जग व त्याचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर आंबेडकरवादच सर्वांगाने परिपूर्ण आहे, अशी त्यांची खात्री पटली. व १९५२ नंतर ते आंबेडकरी विचार विश्वात रममाण झाले. डोळे, सापळा, कोंबडीचोर, आवडी, खुळवाडी, उपकाराची फेड, बुद्धाची शपथ, व गुऱ्हाळ अशा कथेतून तर संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जात वास्तव आणि दलितांची शाहिरी या लेखातून तथा बेकायदेशीर या गणातून त्यांनी आंबेडकरी विचारांचे वादळ समस्त मराठी वाचकांमध्ये उठविले.

प्रज्ञा, शील, करुणा, बंधुता व न्याय या पंचतत्वानुसार प्रत्येकाने आपले चारित्र्य घडवत ज्ञानाला करुणेची व बंधुत्वतेच्या भावनेची जोड द्यावयास पाहिजे व सत्यशील होण्यासाठी निस्वार्थ, न्यायप्रेमी यातून व्यापक मनोवृत्ती केली पाहिजे. असे महान बाबासाहेबांचे वैचारिक तत्व होते. (अण्णाभाऊ बाबासाहेबांचा उल्लेख महान बाबासाहेब असे करायचे.) हेच तत्व अण्णाभाऊंनी वैयक्तिक जीवनात स्वीकारले होते. म्हणूनच त्यांच्या चौफेर लिखानातून सर्व वंचित,उपेक्षित घटकांच्या उद्धाराचा कृतिशील विचार उभारला आहे. व त्यांना तशी मानवी मनाच्या दुःखाचा समग्र वेध घेण्याची दूरदृष्टी ही मिळाली आहे. असे म्हणले तर वावगे ठरणार नाही.! बाबासाहेबांनी एके ठिकाणी असे आव्हान केले होते की अस्पृश्यांच्या इतिहासाची परंपरा शोधली पाहिजे व त्याची ओळख कथा कादंबरीतून दिली पाहिजे. आणि हेच आव्हान अण्णाभाऊंनी स्वीकारले आहे. बाबासाहेब गांधींना पुणे करारा संदर्भातील भेटीत म्हणाले होते की अस्पृश्यवर्ग हा काही शेणामेणाचा नाही. तो हाच अस्पृश्यवर्ग अण्णाभाऊंनी वास्तविकतेला धरून जगासमोर मांडला तोही १४ भारतीय भाषेत तर ८ विदेशी भाषेत. अण्णाभाऊंनी आपली सर्वोत्कृष्ट कादंबरी फकीरा ही बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. दलितांची शाहिरी ह्या आपल्या लेखात महान बाबासाहेब असा उल्लेख करून दिशाहीन दलितांना भिमदिशा दिली आहे. १९४६ पासून अण्णाभाऊंवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव पडला होता, व १९५६ नंतर तर तो अधिकच वाढत गेला. महाराष्ट्र दलित साहित्य परिषदेत आपल्या उद्घाटन पर भाषणात, 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या हातावर तरली आहे.' असे ब्रीद नवदलित साहित्यिकांना दिले. काळानुरूप अण्णाभाऊंच्या या भाषणात फेरफार करून ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नसून श्रमिक कष्टकऱ्यांच्या हातावर तरली आहे असे लिहिले आहे. परंतु बाबासाहेबांनी दलित या संज्ञातच श्रमिक व कष्टकऱ्याची मांडणी केली होती. तसेच चार वर्णापैकी तीनच वर्ण खरे आहेत हे बाबासाहेबांनी आपल्या शूद्र पूर्वी कोण होते.? या पुस्तकात लिहिले आहे. अशीच मांडणी अण्णाभाऊंनी आपल्या दलितांची शाहीरी यात केली आहे. अण्णाभाऊंनी समस्त मानव प्रजातीला आपल्या विवेकीपणातून हे मानवा तू ह्या वास्तव जगाचा गुलाम नाहीस तर तू याचा धनी आहेस. अशी विज्ञाननिष्ठ संकल्पना दिली आहे.



अशा प्रतिभावंत साहित्यकाराला कोटी कोटी प्रणाम.!

**आदर्शराजे विकासराव जोगदंड**
(कार्याध्यक्ष :- तथागत प्रतिष्ठान, बीड)

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे विचार : आपल्या समोरील आजची आव्हाने!

**माझी मैना गावावर राहिली ! माझ्या जीवाची होती या काहीली'!!**

या कवणाद्वारे आपले महाराष्ट्र प्रेम व निष्ठा व्यक्त करणारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे. अशा साहित्य रत्नाचा जन्म वाटेगाव जि. सांगली येथे १ ऑगस्ट १९२० रोजी भाऊ साठे यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे नाव 'तुकाराम' असे ठेवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु संत तुकाराम महाराज यांच्या नावावरून त्यांचे नाव ठेवले गेले. घरात ते थोरले असल्यामुळे लहान भाऊ आणि बहीण त्यांना अण्णा असे संबोधित असत. वाटेगाव हे औंध संस्थानात होते, तेव्हा दलितांच्या मुलांना वेगळी शाळा होती. शिक्षक सवर्ण असल्यामुळे ते दलित मुलांना दूरवर बसूनच त्यांच्या पाठीवर धडे देत असत. पहिल्या दिवशी गिरवणयासाठी दिलेली काही मुळाक्षरे दुसर्या दिवशी अण्णांनी पाठीवर लिहिलेले नव्हते. म्हणून मास्तरांनी अण्णांना फार मोठी शिक्षा केली. त्या दिवसापासून अण्णांनी शाळेकडे पाठ फिरवली. मातंग समाजाला त्याकाळी पिढी जात गुन्हेगारी म्हणून संबोधिले असल्यामुळे दारिद्र्य आणि गुन्हेगारी अशा दोन्ही संकटाचा सामना करावा लागला. १९२५ मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदा संमत झाला व तो मातंग समाजावर लादला गेला. कुठे काही घडले की मातंग समाजाच्या घरांची झाडाझडती घेतली जात असे. जोपर्यंत गुन्हेगार सापडत नाही तोपर्यंत मातंग समाजातील पुरुषांना सळो कि पळो करून सोडत असत. अशा परिस्थितीत अण्णांच्या कुटुंबात माणसांची संख्या अधिक असल्यामुळे उपासमारी ही नित्याचीच बाब होती.

म्हणून वडिल भाऊ साठे यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईला जाण्याचे ठरविले .परंतु पैशाच्या अडचणी असल्यामुळे वाटेगाव ते मुंबई हे अंतर पायी चालून गेले. मिळेल ते काम करू लागले. अण्णाभाऊ यांचे चुलत बंधू ज्ञानदेव यांची भेट मुंबईला झाली. ज्ञानदेव पाचवी ते सातवी पर्यंत शिकलेले होते. त्यांच्या घरामध्ये देव देवतांचे फोटो आणि पुस्तके होती. पुस्तकांची ही थप्पी पाहून अण्णा भाऊ थकित झाले. त्यांची तीक्ष्म नजर फोटो व पुस्तके यावर बसली होती. आणि मलाही जमेल का? म्हणून विचारले. आपले बंधू ज्ञानदेव यांच्याकडून अण्णाभाऊ विविध पुस्तकांचे वाचन करून घेत ऐकत. असे एक वर्ष फक्त ऐकले. ऐकून ऐकून आण्णांनी पुस्तके तोंड पाठ केली ज्ञानदेवाच्या संगतीमध्ये अक्षर ओळख झाली ते वाचू लागले एक वर्ष त्यांनी कोणतेही काम केले नाही. वाटेगाव मध्ये ब्राह्मण शिक्षकाने मारल्यामुळे अण्णा भाऊंची शाळा सुटली परंतु मुंबईमध्ये त्यांच्या चुलत भावाकडून त्यांनी वाचनाची आणि लिहिण्याची कला हस्तगत केली.

अण्णाभाऊ साठे यांच्या २६ कथासंग्रहातून सुमारे १३० कथा प्रकाशित झाल्या. संपूर्ण कथा लेखनातून अण्णाभाऊंच्या बंडखोर मनाने घेतलेली अनुकृतीच अनुभव व्यक्त झाले. समाजातील शोषण, अन्याय, अत्याचार दारिद्र्य, विषमता, लाचारी बलात्कार, अंधश्रद्धा, जातीयता पाहून अण्णाभाऊ अस्वस्थ होते आणि त्यांचे मन पेटून उठत होते. आर्थिक विषमते सोबतच सामाजिक विषमतेचे चित्रणही अण्णाभाऊंच्या कथा मधून पुढे येते. अण्णाभाऊंच्या साहित्यात कल्पनेला वाव नव्हता. प्रत्यक्ष जीवनामध्ये अण्णांनी सोसलं, अनुभवलं प्रत्यक्ष पाहिलं तेच आपल्या



लेखणीतून उभं केलं. अण्णांनी आपल्या लिखानात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्र ला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटक मध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून आपले महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. 'माझी मैना गावावर राहिली,! माझ्या जीवाची होती या काहीली'!!.

अण्णाभाऊ स्वतःच मोठे आहेत त्यांना कोणी मोठे करत नाहीत किंवा अण्णाभाऊ महान आहेत यासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. ज्यावेळी त्यांचे वय २८ होते तेव्हाच १९४८ ला पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक साहित्य परिषदेचे निमंत्रण अण्णाभाऊंना मिळाले होते. १९६१ मध्ये विंडोसोवियत कल्चर सोसायटीने अण्णाभाऊंना रशियाला बोलविले. दीड दिवस शाळेत जाऊन अफाट असे साहित्य निर्माण केले. वीस कथासंग्रह यामध्ये जवळपास ३०० कथा आहेत. ४० कादंबऱ्या पोवाडे, नाटक, लोकनाट्य लावण्या, प्रवासवर्णन, शाहिरी. सात कादंबऱ्यावर चित्रपट असा लिखाणाचा थक्क करणारा प्रवास आहे.

त्यांच्या बऱ्याच कथा या आंबेडकरवादी आहेत. त्यापैकी एक असणारी 'बुद्धांची शपथ' या कथेमध्ये जातीव्यवस्था आणि प्रस्थापितांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले होते त्या धर्मांतराचा प्रभाव गाव खेड्यातील महार जातीवर पडला होता. बौद्ध धर्माने झालेला सकारात्मक बदल सूक्ष्म निरीक्षणाद्वारे अण्णाभाऊ म्हणतात, जग बदल घालूनी गाव सांगून गेले मला भीमराव ! गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत। अंग झाडून निघ बाहेर घे बिनी वरती घाव।। सांगून गेले मला भीमराव ।।

बुद्धाची शपथ ही कथा लिहून अण्णाभाऊंनी एक प्रकारे 'स्वयंप्रकाशित व्हा' हा मार्ग दाखवला. भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याचे दृष्टीने कम्युनिस्ट विचारधारा अपुरी आहे याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. त्यामुळे उत्तर आयुष्यात अण्णाभाऊ आंबेडकरमय अर्थात आंबेडकरवादी झाले होते. अण्णाभाऊ साठे हे पहिले आंबेडकरी कथा लेखक आहेत याची नोंद मराठी वाङ्ममय इतिहासाने न घेणे हा त्यांच्यावरील फार मोठा अन्याय ठरेल. अण्णाभाऊ साठे यांची बहुतांशी साहित्य फुले -शाहू -आंबेडकर यांच्या विचारसरणीला पुढे घेऊन जाणारे आहेत.

अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करून अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष कराल ढा द्या हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग दाखवतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, मी हा रथ फार मोठ्या कष्टाने व श्रमाने ओढत आणला आहे. त्याला पुढे नेता येत नसेल तर जागीच राहू द्या. परंतु कदापिही मागे जाता कामा नये. याचा मतीत्तार्थ म्हणजे आपल्याला जे ७ अधिकार व हक्क मिळवून दिले आहेत ते भलेही वाढविता येत नसतील तरी चालेल. परंतु ते कमी होता कामा नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत एकूण ७० अधिकार व हक्क याची मागणी एससी व एसटी समूहासाठी केली होती. परंतु त्यापैकी फक्त सात अधिकार व हक्क संविधानात मिळाले आहेत. बाकी ६३ अधिकार व हक्क आपल्याला मिळणे बाकी आहे. त्यासाठी अनुसूचित जाती व जमाती मधील संघटना, पक्ष, नेते यांनी चळवळ उभी करणे आवश्यक आहे. उत्पादन करणाऱ्या व सेवा देणाऱ्या सरकारी संस्था, कंपन्या यांचे खाजगीकरणाचे धोरण सरकारने अवलंबिले आहे. जसे की बीएसएनएल, एम एस ई बी, रेल्वे, विमान इत्यादी प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात आरक्षण मिळवून देणारे क्षेत्र आपल्याला सांगता येतील. या सर्वांचे खाजगीकरण करून सरकारने आरक्षण संपविल्यात जमा आहे. त्यासाठी आपल्याला राष्ट्रीय स्तरावर आंदोलन उभे करणे गरजेचे आहे आरक्षण वाचविले तरच आपल्याला प्रतिनिधित्व करता येईल. हिंदुत्ववाद्यांच्या विचारांच्या आमिषाला बळी पडून अनुसूचित जातीतील काही संघटना, पक्ष त्यांच्या वरचणीला जाऊन बसले आहेत. त्यामुळे समाज गोंधळलेल्या अवस्थेत आहे. येथील व्यवस्थेने आरक्षण संपवण्यासाठी अनुसूचित जातीत उपवर्गीकरण अ ब क ड याचे मृगजळ दिले आहे. त्याचे समर्थन काही नेते करीत आहेत.

आंबेडकरवादी विचाराची मोट एकत्र केली तर समाजाला दिशा मिळू शकते. समाजाने लक्षात घेतली पाहिजे की शिक्षण महत्त्वाचे आहे व शिक्षणासाठी पैसा आवश्यक आहे मात्र अंधश्रद्धा, यात्रा, नवस, कंदुरी अशा खर्चिक परंपरा व प्रथेला मातंग समाज काही बांधव आज देखील चिटकून आहे. तो खर्च त्यांनी टाळावा. गॅट करारामुळे जागतिक बाजारपेठ खुली झाली आहे. त्यामुळे देशातील निर्यात त्या प्रमाणात फार कमी आहे. ज्या प्रमाणात आयात सुरू आहे. स्थानिक उद्योगधंदे व रोजगार कमी झाला आहे त्यामुळे आजचा आपला तरुण वैफल्यग्रस्त झाला आहे .त्याला दिशा देण्याचे काम आंबेडकरवादी म्हणून आपण करणे आवश्यक आहे. नव्हे ती आपली जबाबदारीच आहे. आपण सर्वांनी मिळून हि जबाबदारी स्वीकारणे म्हणजेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना खरे विनम्र अभिवादन ठरेल.



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**प्रा.शशिकांत जावळे**
९४२३४७३२०४

# महाजनवाडी येथे सौर ऊर्जेच्या मोटारीची चोरी

## नेकनुर पोलिसांकडून फिर्यादीला त्रास : शेतकऱ्यांचा संताप

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीमध्ये शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा पंप, विद्युत मोटारी, रोहित्राच्या वायर इत्यादींच्या चोरीच्या घटनांमध्ये सतत वाढ होत असून, प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर महाजनवाडी येथील शेतकरी रामचंद्र घरत यांच्या शेतातील नुकत्याच बसवलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतील पंपाची चोरी झाली.



शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नेकनुर पोलिस प्रशासनाने तक्रार घेण्यास दोन दिवस टाळाटाळ करत, अखेर लिंबागणेश पोलिस चौकीत सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख यांनी तक्रार लिहून घेतली. मात्र, यामध्ये आणखी गंभीर बाब म्हणजे पंपाची मूळ किंमत ६५,००० असतानाही पोलिसांनी ती केवळ २ ते ४ हजार दाखवण्याचा आग्रह धरला. सोने दुकानातून बाहेर गेल्यावर जशी किंमत कमी होते, तशीच या पंपाची देखील झाली आहे, असे अजब स्पष्टीकरण नेकनुर पोलिसांनी दिले, असे रामचंद्र घरत यांनी सांगितले.

या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. पोलिस चोरांना पकडण्याऐवजी फिर्यादीलाच संशयाच्या नजरेने पाहतात, किंमती कमी करायला लावतात, आणि दोन-दोन दिवस हेलपाटे मारायला लावतात, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

वाढत्या चोरीच्या घटनांवर पोलिस प्रशासन नियंत्रण आणण्यात अपयशी ठरत आहे. शेतकरी उपयोगी साहित्य - मोटारी, वायर, सौर पंप चोरीला जात असतानाही नीट तपास केला जात नसल्याने चोरांचे मनोधैर्य अधिकच वाढले आहे. यामुळे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी दिला आहे. प्रमुख मागण्या शेतकऱ्यांच्या तक्रारी तत्काळ घेतल्या जाव्यात. चोरीच्या घटनांचा तपास जलद गतीने करावा. पोलिसांनी शेतकऱ्यांवर अन्याय न करता सहकार्य करावे. नुकसान भरपाईसाठी योग्य किंमतीचा आधार मानावा.

# बीडमधील वकील निळकंठ बारगजे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि अभ्यासू वृत्तीने, आयुष्याच्या प्रत्येक वळणावर यशस्वी झालेले आमचें मार्गदर्शक बीड येथील प्रसिद्ध वकील निळकंठ बारगजे आपला वाढदिवस साजरा झाला. आपणास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! आपल्या कर्तृत्वाने आपण आपले वर्तमान, भविष्य निर्माण केलेत. त्याबद्दल आम्हाला आपला सार्थ अभिमान आहे. आपण आपल्या प्रेमळ व मितभाषी स्वभावाने अगणित मित्रपरिवार उभा केला आहे.

सुख -दुःखाच्या प्रसंगी आपण सर्वांना आधार देण्यासाठी सतत आघडीवर असतात. आपला मनमिळावू स्वभाव, कामाची चिकाटी, जिद्द, कार्यतत्परता या गुणामुळे आपण नेत्रदिपक प्रगती केली आहे. आपल्या मित्र परिवाराला तुम्ही एक मजबुत आधारस्तंभ लाभला आहात. आयुष्यातले सगळे क्षण आठवणीत राहतात अस नाही. पण काही क्षण असे असतात जे विसरु म्हणताही विसरता येत नाहीत. हा वाढदिवस म्हणजे त्या अंनत क्षणातला असाच एक क्षण.. हा क्षण मनाला एक वेगळ समाधान देईलच. पण.. आमच्या शुभेच्छनी वाढदिवसाचा हा क्षण एक 'सण होऊ दे हिच सदिच्छा..! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना अँड. अँड गहिनीनाथ केकान सर, अँड दिपक खाडे, अँड दिपक रोटे, शंशाक धन्वे, बिवरे सर, शेख शरिफ भाई, वराटसर, सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे बीड शहर उपाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील, सौरभ मुंडेसह आदी मान्यवरांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला.



# बीड जिल्हा समितीकडून बांधकाम कामगारांच्या प्रश्नासाठी कामगार अधिकारी यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा कामगार निवारण समितीच्या वतीने कामगार विभाग एस.जी. कोनाळे यांनी कार्यभार स्वीकारला त्याकारणाने सत्कार करण्यात आला. तसेच बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत तसेच त्यांच्या नोंदणी नूतनीकरणाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली व विनाकारण कामगारांचे फार्म त्रुटीमध्ये न टाकण्याचा विनंती केली व सरकारी कामगार अधिकारी साहेबांनी आश्वासन दिले की सर्व कामगारांचे प्रश्न ऑफलाइन ऑनलाईन हे लवकरात लवकर सोडवण्यात येईल व विनाकारण एकही फॉर्म त्रुटी मध्ये जाणार नाही.




सोबत बाबा खान, इमरान इनामदार, तौफिक काझी, चौगुले साहेब, सलमान अली, मंगेश जोगदंड, अशोक घेणे, भागवत बदाडे, इमरान शेख, शाहेबाज पटेल, इमरान शाह, शेख सोहेल, शाहेद शेख, नारायण निंबाळकर, शेख कौसर, शेख सोहेल, शेख युसुफ आदी उपस्थित होते.

# विधिज्ञ साहित्य संमेलनात ॲड. प्रबोधन निकाळजे यांनी समता बंधुता गीत केले सादर

**आष्टी । प्रतिनिधी**

छ. संभाजीनगर - मराठवाड्याच्या भूमीवर नुकतेच इतिहास घडवणारे भारतातील पहिले विधिज्ञ साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात विवेक विचार मंचचे मराठवाडा विभाग संयोजक व आष्टी येथील तरूण वकील ॲड. प्रबोधन निकाळजे यांनी स्वतः रचलेले आणि गायलेले समता बंधुता गीत सादर करत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पित करून भावपूर्ण अभिवादन केले. या गीतास सध्या सोशल मिडियावरून मोठा प्रतिसाद मिळत असून अनेकांनी याचे स्वागत केले आहे.



या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे हे उपस्थित होते. संमेलनाचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते झाले. तसेच प्रथम सत्राचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनिष पितळे हे होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीने संमेलनाचा वैचारिक आणि न्यायवैधानिक दर्जा अधिक उंचावला. पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज या संस्थेच्या वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजनात ॲड. संजीव देशपांडे, ॲड. अनिल गोळेगावकर, ॲड. संभाजी टोपे तसेच संभाजीनगर उच्च न्यायालय वकील संघातील अनेक विधिज्ञ यांचा मोलाचा सहभाग होता. विधिज्ञ साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कायदा, साहित्य आणि सामाजिक समतेच्या विचारांचा सुंदर संगम घडून आला. समता बंधुता गीत हे याचे प्रमुख आकर्षण ठरले आहे.



# भागूजीराव ढेकळे विद्यालयात स्व. सोनाजीराव क्षीरसागर यांचा स्मृतिदिन साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात कर्मयोगी स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांचा स्मृतिदिन बुधवार दि.३० रोजी साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम नानांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य ए.एस. थिटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. अरुण कळासे, पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी नानांच्या कार्यावरती प्रकाश टाकला. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरून...

### बीड जिल्ह्यातील विजेच्या प्रलंबित कामांसाठी महत्त्वपूर्ण आढावा बैठक

आणि बरड येथील २२० केव्ही उपकेंद्रांपासून नवीन ३३ केव्ही फीडर टाकण्यासाठी योजना राबवण्याची गरज त्यांनी मांडली. युसुफवडगाव, धनेगाव, जवळबन, साळेगाव या उपकेंद्रांमध्ये व्हिसीबी, सीटी, पीटी, आयसोलेटर व अर्थिंगची दुरुस्ती करून त्यांची क्षमता वाढवण्यावरही भर दिला.

अंबाजोगाई उपविभागात नवीन दोन उपविभाग तयार करावेत, पठाण मांडवा गावाचा अंबाजोगाई विभागात समावेश करावा, तसेच ५१९ उच्चदाब व ४८९ लघुदाब पोल, १०७ वितरण बॉक्स बदलण्याची, ४७ किलोमीटर नवीन ११ केव्ही लाईन उभारण्याची आणि शेती फिडरवरील भार कमी करण्यासाठी २२ लाईन कपॅसीटर बसवण्याची तातडीची गरज त्यांनी बैठकीत ठळकपणे मांडली. अंबाजोगाईतील कनिष्ठ व सहाय्यक अभियंत्यांच्या रिक्त पदांची भरती त्वरीत करावी यासाठीही त्यांनी ठोस पाठपुरावा केला. आ. नमिता मुंदडा यांच्या या ठोस भूमिकेमुळे केज आणि अंबाजोगाई भागातील नागरिकांना दर्जेदार वीज सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची आशा निर्माण झाली आहे.

### एसटी चालक आणि वाहकाचा प्रामाणिकपणा

# एक लाखाचा ऐवज आगाराकडे केला सुपूर्द

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाची पैशाची व डब्याची बॅग गाडीतच विसरली. त्यानंतर एसटीचे चालक श्री गोपीचंद आटपळकर आणि वाहक श्री सुरेश पवार सर या दोघांच्याही लक्षात आल्यानंतर बॅग उघडून पाहिले तर रोख रक्कम एक लाख रुपये व जेवणाचा डब्बा असा ऐवज त्यामध्ये असल्याचे निदर्शनास आला.



बॅगेमध्ये संबंधित प्रवाशाचा मोबाईल नंबर सापडण्याचा व त्यावरून प्रवाशाला संपर्क करण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता मात्र संपर्क होऊ शकला नाही म्हणून चालक आणि वाहकाने त्यांचा एक लाख मोलाचा ऐवज गेवराईच्या आगारप्रमुख कालिके साहेब यांच्याकडे जमा करत प्रामाणिकपणा जपल्याची आनंददायी वार्ता गेवराई डेपोमध्ये घडली आहे.

# डॉ.संतोष मुंडे यांच्या हस्ते रामचंद्र खोडके यांना मोफत स्कुटीचे वाटप

## परळी तालुक्यातील ४ दिव्यांगाना मिळाला मोफत स्कुटीचा लाभ

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्य परिषद अंतर्गत जिल्हा समाज कल्याण च्या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य दिव्य कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या हातचे दिग्रस येथील दिव्यांग रहिवासी रामचंद्र वशिष्ठ खांडके यांना मोफत स्कुटी चे वाटप करून या मोफत स्कुटी वाटपा योजनेचे उद्घाटन करण्यात आले. बीड जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाज कल्याणच्या योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात एकूण ५४ स्कुटीचे वाटप करण्यात आले आहे आणि त्यातील चार स्कुटीचे वाटप परळी तालुक्यातील दिव्यांग यांना झाले आहे.



अशी माहिती दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे प्रात्यक्षिक डॉ. संतोष मुंडे यांनी दिली आणि अशा या मोफत स्कुटी वाटप योजना बद्दल आ.धनंजय मुंडे, पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे तसेच दिव्यांग कल्याण मंत्रालय मंत्री अतुल सावे यांचे सर्व दिव्यांगाच्या वतीने आभार मानले. मा.आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे डॉ. संतोष मुंडे. दिव्यांगासाठी विविध योजना आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असतात आणि त्या प्रयत्नांना यशस्वी करून दिव्यांगाच्या यांच्या जीवनात काहीतरी सुलभता कशी सांगता येईल याचाच विचार ते सतत करत असतात. याचाच एकभाग म्हणजे ही मोफत स्कुटी वाटप योजना आहे.

अशा या मोफत स्कुटी वाटप योजनेमुळे परळी तालुक्यातील व संपूर्ण जिल्ह्यातील दिव्या बांधवाचे एक आनंद उत्सव निर्माण झाला आहे आणि त्याबद्दल सर्व दिव्यांग बांधवांनी आ. धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे, दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अतुल सावे तसेच दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांचे आभार मानले.



दि.२९ मंगळवार रोजी जालना येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आदरणीय हर्षवर्धन दादा सपकाळ यांची भेट घेऊन पाटोदा तालुका काँग्रेसच्या कार्याचा आढावा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी दिला. त्याच बरोबर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य पाटील, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह सर्व नवनियुक्त पदाधिकारी उपस्थित होते.



आज जालना येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे आध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांचा बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकावर सविस्तर चर्चा झाली.

# आंतरराष्ट्रीय स्पर्धेनिमित्त भारताच्या रग्बी संघाच्या सराव शिबिरासाठी बीडच्या ३ खेळाडूंची निवड

**बीड । प्रतिनिधी**

नेताजी सुभाषचंद्र बोस क्रीडा संकुल कोलकत्ता, पश्चिम बंगाल येथे दिनांक १ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान १८ वर्षाखालील गटाच्या भारतीय संघाची निवड चाचणी संपन्न होत आहे. या निवड चाचणीसाठी पूर्ण भारत देशातील सर्वोत्कृष्ट २७ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंमध्ये मोरया क्रीडा मंडळ बीड तसेच बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे कीर्ती किरण जाधव व दिपाली दिलीप ताठे या दोन खेळाडूंची निवड सराव शिबिरासाठी करण्यात आली आहे. सदरील सराव शिबिर ४० दिवस चालणार आहे. सदरील स्पर्धेत निवड होणारे खेळाडू आशियाई चॅम्पियनशिप १८ वर्षाखालील गटासाठी होनोट, चायना येथे होणाऱ्या स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.




तसेच २० वर्षा खालील मुले गटात सर्वोत्कृष्ट २४ खेळाडू सबंध भारतातून निवडण्यात आले आहेत. यात महाराष्ट्रातून फक्त बीडच्या यश बालासाहेब जाधव या खेळाडूचे निवड करण्यात आली आहे. २० वर्षाखालील गटाची आंतरराष्ट्रीय स्पर्धा यावर्षी भारतातील राजगीर, बिहार येथे संपन्न होणार आहे. सदरील सराव शिबिर नेताजी सुभाषचंद्र बोस क्रीडा संकुल कोलकत्ता, पश्चिम बंगाल येथेच संपन्न हाते आहे. मागील वर्षी १८ वर्षाखालील गटात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय संघात आपले स्थान निश्चित करून बीडच नव्हे तर मराठवाड्यातील रग्बी खेळातील प्रथम आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्याचा मान यश जाधव या खेळाडूंनी मिळाला होता.

सर्व खेळाडूंना मोरया क्रीडा मंडळ बीडचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक तसेच बीड जिल्हा रग्बी मुख्य प्रशिक्षक नितीन येळवे, रग्बी प्रशिक्षक तथा कारागृह पोलीस (बीड) शोएब खाटीक, तसेच अशोक चौरे सचिव मोरया क्रीडा मंडळ, यांनी अतिशय उत्तम प्रशिक्षित केलेले आहे. तसेच हा खेळ शासनाच्या नौकरी मधील ५% आरक्षणात असल्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांनी आणि खेळाडूंनी यात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटने कडून करण्यात येत आहे.

या कामगिरीबद्दल बीड जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख, सचिव श्री महेश घुले, उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष हरिभाऊ बांगर, कार्याध्यक्ष नितीन येळवे कारागृह पोलीस तसेच प्रशिक्षक शोएब खाटीक, प्रशिक्षक अशोक चौरे, मार्गदर्शन भगवानराव बागलाने, शिवराज देवगुडे, साईनाथ राजे (जालना), बाळासाहेब जाधव (सरपंच लिंबागणेश), किरण जाधव, दिलीप ताठे, मुकुंद घोडके, अनिरुद्ध बहीर, महादेव नरवडे, मंडळाचे सर्व राष्ट्रीय - राज्यस्तरीय रग्बी खेळाडू, राष्ट्रीय पंच संभाजी गिरे, इतर सर्व पदाधिकारी आणि समस्त मोरया क्रीडा मंडळ परिवार बीड आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# लिंबागणेश येथे नागपंचमी निमित्त भलोबा सण उत्साहात साजरा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे हिंदु पंचांगानुसार श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्षातील पंचमीला साजरा करण्यात येणाऱ्या नागपंचमीच्या सणाचा भाग म्हणून पंचमीच्या दुसऱ्या दिवशी पारंपरिक भलोबा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मातीद्वारे बनविलेल्या वारुळांची दुध, पाणी, हळद, तांदुळ, फुले वाहून पूजा करुन महिला वर्तुळाकार आकार तयार करून फेर धरून पारंपरिक गाणे गाण्यात आली.

वारुळाची वाजतगाजत सवाद्य गावात मिरवणूक काढण्यात आली. पोखरवाड्याच्या बंधाऱ्यात वारुळांचे विधिवत पुजण करून विसर्जन करण्यात आले. लिंबागणेश येथे हा मान दिगंबर मुळे आणि उत्तरेश्वर जोगदंड यांचा असतो. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा करण्यात येणाऱ्या भलोबा पुजेद्वारे नागांचे कल्याण व्हावे आणि कोणतीही हानी पोहोचु नये या भावना व्यक्त करत आमचे रक्षण कर म्हणून प्रार्थना केली जाते. पौरानिक कथानुसार या दिवशी भगवान श्रीकृष्णाने कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसांपासून नागपुजा प्रचारात आली असे मानले जाते.

या दिवशी महिला घराची स्वच्छता करतात.जमिनी शेणाने सारवितात, अंगणात रांगोळी काढतात. पौराणिक आख्यायिकेनुसार एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्लं मृत्युमुखी पडली त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही, कोणीही खणत नाही, घरी कोणी भाज्या चिरायच्या नाही व कुटायचे नाही असे काही नियम पाळण्याची प्रथा आहे.

# सीमाताई ओस्तवाल यांचा वाढदिवस साजरा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्येच नव्हे तर अख्या मराठवाड्यामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये आपल्या आगळ्यावेगळ्या उत्कृष्ट उपक्रमातून व कार्यातून एक ठसा उमटून आपले आगळे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या अशा बीड जिल्ह्यामध्ये आपल्या उत्कृष्ट कार्यातून इतिहास घडवणाऱ्या लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या सीमाताई ओस्तवाल यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनस्वी शुभेच्छा देताना महाराष्ट्र मध्ये सर्वात अग्रेसर असलेल्या तसेच सर्वांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणाऱ्या लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य सह उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स बीड तालुका प्रतिनिधी संजय देवा कुलकर्णी सह मान्यवर उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट समाजसेविका ज्यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये आपल्या उत्कृष्ट समाज सेवेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यामध्ये अनेक उत्कृष्ट समाज सेवेसाठी उपक्रम राबून नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक उत्कृष्ट आपले एक आगळे वेगळे स्थान निर्माण करून एक आगळा वेगळ आदर्श निर्माण करणाऱ्या अशा लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या समाजसेविका सीमाताई ओस्तवाल मॅडम यांना वाढदिवसानिमित्त लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने शुभेच्छा देताना संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब सह संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर आदी उपस्थित होते.



# १५९ कोटींच्या नगररोडच्या दर्जाहिन कामामुळे तरुण वकिलाचा मृत्यू

## दुचाकी -कारची धडक; तिप्पटवाडी फाट्याजवळ एकाच बाजूने वाहतूक; ४ महिन्यातच उखडलेल्या, भेगा पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती तरीही अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात काम दर्जेदारच

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या बीड - अहिल्यानगर या २४ .५ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सव्वा वर्षापुर्वी सुरूवात झाली. डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र अद्यापही काम पूर्ण झालेले नाही.विशेष म्हणजे ४ महिन्यांपूर्वी तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला काही ठिकाणी खड्डे, तडे गेल्याने, भेगा पडल्याने दुरुस्ती करण्यात येत आहे. या १५९ रूपये किंमतीच्या बेसुमार दर्जाच्या रखडलेल्या कामामुळे काल एका वकील तरुणाला आपला जीव गमवावा लागला असुन याची जबाबदारी कोणाची असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बुधवार दि.३० रात्री शहरानजीकच्या तिप्पटवाडी फाट्याजवळ हा अपघात झाला असुन वैभव महारूद्र सांगळे वय २५ वर्षे रा.उक्कडपिंप्री ता.गेवराई असे अपघातात ठार झालेल्या तरुण वकिलाचे नाव आहे.४ महिन्यापुर्वीच तयार केलेल्या रस्त्याला तडे, भेगा पडल्याने उकडलेल्या, भेगा पडलेल्या ठिकाणी दुरुस्ती सुरू आहे. त्यासाठी एका बाजूचा रस्ता बंद केल्याने दोन्ही बाजूंची (अहिल्यानगर कडून येणारी आणि बीड कडुन जाणारी वाहने) वाहतूक एकाच बाजूने सुरू राहिली. दरम्यान दुचाकीला कारने धडक दिली. यात गंभीर जखमी झालेल्या वैभव सांगळे या तरुणाचा मृत्यू झाला. वैभव दुचाकीवरून राजुरीकडून बीड कडे येत असताना समोरून आलेल्या कारची दुचाकीला धडक बसून हा अपघात झाला.

अनेक वर्षापासून रखडलेल्या बीड - अहिल्यानगर या महामार्गाच्या २४.५ किलोमीटर रस्ता कामासाठी १५९ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय महामार्ग निधीतुन उपलब्ध झाला आहे. जून २०२४ मध्ये रस्ता कामाची सुरुवात झाली. डिसेंबर २०२४ पर्यंत काम करण्याची मुदत होती. मात्र काम संथगतीने सुरू असल्याने तीन किलोमीटर रस्ता पूर्ण झालेला नाही. तसेच नाली व दुभाजकाचे कामही अनेक ठिकाणी अपूर्ण आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंड ठोठावुनही सुधारणा झालेली नाही. दरम्यान ४ महिन्यापूर्वी सिमेंट रस्ता बांधूनही उखडलेल्या भेगा पडलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे.

तब्बल १५९ कोटी रुपये खर्चून करण्यात येत असलेल्या नगररोडचे काम ४ महिन्यांपूर्वीच झालेल्या रस्ते कामाला काही ठिकाणी खड्डे तर काही ठिकाणी तडे, भेगा पडलेल्या आहेत. संबंधित प्रकरणात तक्रार केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण बीड विभाग अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात सिमेंटचा थर देताना चुकुन रेक्झिनचा एक बंच क्रांक्रीटमध्ये गेला होता तो काढताना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खड्डे पडलेले आहेत.खड्डे बुजविण्यात आले असुन काम दर्जेदारच झाले आहे. आठ ते दहा ठिकाणी उकडलेल्या, भेगा पडलेल्या रस्त्याच्या ठिकाणी दुरूस्तीचे काम सुरू असुन काम करताना बॅरिकेट्स व तत्सम सर्व उपाययोजना करून दिशादर्शक ही लावण्यात आले आहेत. असे म्हणत दर्जाहीन कामाला दर्जेदार कामाचे प्रशस्तिपत्र देऊन टाकत आहे. एकंदरीतच डॉ.राजेंद्र भोपळे कंत्राटदाराची पाठराखण करताना दिसुन येत आहे.






# अंबाजोगाई शहरातील पुरातन विहीर वाचली पाहिजे : लोक जनशक्ती पार्टी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात सध्या खूप मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र बँकेसमोरील पुरातत्त्व विभागाच्या विहिरीवर नगरपालिका प्रशासनाने केलेल्या नियमबाह्य अतिक्रमण काढण्यात यावे यासाठी आंदोलने सुरू आहे त्यातील पहिला टप्पा हा बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सुरू करण्यात आला त्याच्याच पुढे अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी मुख्याधिकारी अंबाजोगाई यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आली.

वहिरीवर केलेले अतिक्रमण निगरगट्ट प्रशासन काढण्यास तयार होत नाही हे आंदोलकांच्या लक्षात आल्यावर अंबाजोगाई नगरपरिषदेवर सर्वपक्षीयांच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला. त्यालाही प्रशासनाने दात दिली नाही निवेदन कर्त्यांना पूर्व उडवींची उत्तरे देण्यात आली आणि लेखी स्वरूपात नगर परिषदेचा महसूल वाढण्यासाठी ही जागा अधिग्रहण करण्यात आली आहे असे पत्र दिले परंतु आंदोलनकर्त्यांचे याच्यावर समाधान झाले नाही म्हणून आंदोलनकर्त्यांनी भीक मागून आंदोलन करून अंबाजोगाई नगर परिषदेला पंधरा हजार पाचशे त्रेपन्न रुपये ५० पैसे निषेध म्हणून दिले तरीही संबंधित विहिरीवरील अतिक्रमण निघाले नाही विशेष करून या दुकानात मोठे किराणा होलसेल दुकान टाकले. अंबाजोगाई शहरामध्ये असे शेकडो भूखंड आहेत की ते हातावर पोट भरणाऱ्या लोकांना देता आले असते परंतु निगरगट्ट प्रशासनाने हे भूखंड आपल्या मर्जीतील काही लोकांना कमी किमतीमध्ये देऊन नगरपालिकेची लूट सुरू केलेली आहे गरिबांना एक आणि श्रीमंतांना एक न्याय अशी भूमिका अंबाजोगाई नगर परिषदेच्या प्रशासनाची झाली आहे. त्यामुळे लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने अंबाजोगाई नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात दि.३० पासून आमरण उपोषणास बसण्यात आले आहे.

# केज-कळंब रोडवर बस दुचाकी अपघातात एक ठार एक जखमी

**केज । प्रतिनिधी**

शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथे बस दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि.३०) दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. गणेश बंकट अंबिरकर असे ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.



याबाबत अधिक माहिती अशी, गणेश बंकट अंबिरकर राहणार डिकसळ ता कळंब (वय ४०) आणि अब्बास शेरखान पठाण (वय ६०) मूळ रहिवाशीला लाखा ता केज (ह. मु. इस्लामपुरा कळंब)हे दोघे कळंब येथून सुर्डी येथील एका कार्यक्रमानिमित्त दुचाकीवरून (MH२५ Z ३४६३) निघाले होते. सुर्डी फाट्याजवळ आल्यानंतर सुर्डी कडे जाणाऱ्या रस्त्याकडे दुचाकी वळवली त्याचवेळी मागून पुणेहुन वसमत (MH २० BL ५८५०) कडे जाणारी एसटी बसचा दुचाकींला धक्का लागून दुचाकीवरील दोघे खाली पडले आणि बसचे मागील चाक गणेश अंबिरकर यांच्या डोक्यावरून गेले त्यामुळे त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. तर अब्बास शेरखान पठाण हे जखमी झाले आहेत.

दरम्यान, अपघात होताच बस चालकाने बस युसुफवडगाव पोलीस ठाण्यात नेऊन लावली आणि अपघाताची माहिती दिली. युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नी. मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.शेंडगे संपत व कोकाटे महेश यांनी अपघात स्थळाचा पंचनामा केला.त्यानंतर ऍम्ब्युलन्स ने गणेश अंबिरकर यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कळंब येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# वाङ्‌मयीन भाषिक गुण वाचकाला समृद्ध करतात : डॉ. अशोक घोळवे

**पाटोदा । प्रतिनिधी**

साहित्यात वापरली जाणारी भाषा कलात्मक, भावपूर्ण, शैलीदार आणि अभिव्यक्तीपूर्ण असते, म्हणूनच हे वाङ्‌मयीन भाषिक गुण वाचकाला भावनिक, सौंदर्यपूर्ण व बौद्धिक पातळीवर समृद्ध करतात, असे प्रतिपादन भाषा अभ्यासक प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले. जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचा 'मराठी विभाग' आणि शिरूर कासारच्या कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा 'मराठी विभाग' यांच्या संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'अतिथी व्याख्यान' प्रसंगी डॉ. अशोक घोळवे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नाटककार - समीक्षक प्रा. बापू घोक्षे हे होते.

प्राचार्य डॉ. विश्वासराव कदम यांच्या मार्गदर्शना खाली संपन्न झालेल्या या अतिथी व्याख्यानाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी केले. 'मराठी विभागाच्या' अतिथी व्याख्यानमालेत पुढे बोलतांना डॉ. अशोक घोळवे यांनी प्रसाद, माधुर्य, ओज, दृश्यात्मकता, भावगर्भता, संवेदनशीलता, अलंकारिता, सांस्कृतिक संदर्भता आदी वाङ्‌मयीन भाषिक गुणांचा परामर्श घेतला. अध्यक्षीय समारोपात प्रा. बापू घोक्षे यांनी वाङ्‌मयीन भाषिक गुणांचे महत्व विषद करून भरतमुनींच्या रससिद्धांताची चर्चा केली. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे, महाविद्यालयाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक, प्राध्यापक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. प्रविण शिलेदार यांनी केले.

# शेतकरी व कुरेशी बिरादरीच्या पाठीशी सर्व समाज घटकांनी उभं राहावं : हमीद पाले खान व अखिल अण्णा

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या काळात शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असूनही त्याच्या अडचणींना पुरेसं गांभीर्याने घेतलं जात नाही. त्याचप्रमाणे कुरेशी बिरादरीदेखील अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आव्हानांचा सामना करत आहे. या दोन्ही समाज घटकांनी देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. पण आज त्यांना अन्याय, दुर्लक्ष आणि भेदभावाला सामोरं जावं लागतंय. हे फक्त त्यांच्या नाही, तर आपल्या संपूर्ण समाजाचं अपयश आहे.





महाराष्ट्रात लागू असलेल्या गोहत्या प्रतिबंधक कायदा हा जनावरांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आणण्यात आला होता, पण काही ठिकाणी या कायद्याचा वापर चुकीच्या हेतूने, शेतकरी व कुरेशी समाजावर अन्याय करण्यासाठी होत असल्याचं चित्र दिसून येतं आहे. म्हणूनच, समाजातील प्रत्येक घटकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून शेतकरी आणि कुरेशी समाजाच्या पाठीशी ठामपणे उभं राहणं गरजेचं आहे. त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणं, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड येथील जी.एन फॅकशन हॉल येथे शुक्रवार दिनांक ०१/०८/२०२५ रोजी संध्याकाळी सात वाजता मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून शेतकर्या सह प्रत्येक समाज घटकांनी उपस्थित राहवे असे आवाहन समाजसेवक हमीद पाले खान व अखिल अण्णा यांनी केले आहे.

# मोकाट जनावरांमुळे अपघात होण्याची शक्यता

## मेन रोडच्या मधोमध बसण्यामुळे वाहतुकीस अडथळा; नगरपरिषद प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील मेन रोड यशवंतराव चौक राजीव गांधी चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक व सावरकर चौक बस स्थानका कडे नेहमी वाहतूक वर्दळीच्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे वावरतात त्यामुळे रस्त्यावरून जाताना लहान मुले महिला पुरुष यांना खूप त्रास होतो. मोकाट जनावरे हे रस्त्याच्या मधोमध उभे राहतात तर कधी कधी रस्त्याच्या मधोमध बसतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि रस्त्यावर वाहतूक कोंडी होते.



मोकाट जनावराच्या कधीकधी झुंजही लागतात त्यामुळे महिला, पुरुष, शाळकरी मुलांना रस्त्यावरून जाताना जीव मोठी धरून चालावे लागते. रस्त्यावरील जनावरामुळे वाहतूक व्यवस्थेस खूप मोठी अडचण होते. तरी या जनावरचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्या त टाकावे अशी मागणी नागरिक करत आहेत. अंबाजोगाई शहरांमध्ये प्रत्येक रस्त्यावर प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट जनावरांचा जास्त प्रमाणात जमावं होतो आहे या जनावराच्या जमावंमुळे सर्वसामान्य नागरिक, शाळकरी मुले महिला यांना खूप त्रास होतो कधी कधी भर रस्त्यावर जनावरांची झुंज लागते यामुळे शाळकरी मुलांना आपला जीव मुठीत घेऊन ये जा करावी लागते. मोकाट जनावरे भर रस्त्यावर बसतात यामुळे वाहतुकीची अडचण होते. अंबाजोगाई शहरातील मोंढा मार्केट मंगळवार आठवडी बाजार रविवार शुक्रवार या दिवशी खूप मोठा बाजार असल्यामुळे बाजारामध्ये मोठी गर्दी असते. या गर्दीमध्ये सुद्धा मोकाट जनावरे बाजारामध्ये फिरतात. यामुळे बाजार करणाऱ्या महिला पुरुषांना सुद्धा खूप त्रास होतो. तरी नगरपरिषद प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्यात टाकावे. मोकाट जनावरे जास्त प्रमाणात वाढले आहेत यामुळे नागरिकांना त्रास होतो हा त्रास होऊ नये यासाठी नगरपरिषद प्रशासनाने जनावरांना कोंडवाड्यात टाकून जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी अंबाजोगाई शहरातील नागरीक करत आहेत.

# पीक विम्याचे निकष पूर्वीप्रमाणेच करून मुदतवाढ द्या : डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने पिकविमा योजनेत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे. विमा योजनेत सहभागी होण्याची तारीख ३१ जुलै असताना राज्यात फार कमी शेतकऱ्यांनी विम्यासाठी अर्ज केले आहेत. आज पिक विमा भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे आता अर्जाची संख्या वाढण्याची शक्यता कमी आहे. येणाऱ्या काळात पावसाच्या लहरीपणामुळे पीक विम्या पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्याकरिता शासनाने पिक विमा भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि पीक विम्याचे नियम पूर्वीप्रमाणेच करावेत अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली आहे.

राज्य सरकारने सुरू असलेली एक रुपयात पिक विमा योजना बंद केल्याने शेतकऱ्याला जास्तीची रक्कम भरावी लागते. या निर्णयामुळे शेतकरी या योजनेकडे पाठ फिरवताना दिसत आहेत. तसेच पिकविमा योजनेच्या भरपाईत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. आता पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवर आधारित नुकसान भरपाई दिली जाणार आहे. पूर्वी चार ट्रिगरच्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात होती, मात्र आता त्यात बदल झाल्याने शेतकरी नाराज आहे.



प्रधानमंत्री कृषी पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ च्या विमा हप्ता भरण्यासाठीचा एक दिवस बाकी असतानाही राज्यातील नगण्य शेतकऱ्यांनी विमा हप्ता भरल्याचे निदर्शनास आले आहे. मागील योजनेतील महत्त्वाचे जे ट्रिगर होते त्यातील एक ट्रिगर हा पावसाने सतत २१ दिवसाचा खंड दिल्यास २५ टक्के अग्रीम मिळण्याची यात तरतूद होती. ती तरतूद वगळून केवळ नुकसान आधारित पिक विमा मिळण्याची तरतूद करण्यात आलेली असणे आणि शेतकऱ्यांना क्षेत्रानुसार प्रीमियम भरावा लागत असणे या बाबींमुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय संभ्रमाचे आणि निरुत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे आगामी काळातील निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसल्यास हा शेतकरी पूर्णपणे कोलमडून जाणार आहे. जेव्हा महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होतात तेव्हा या बाबींकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना या पिक विमा योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल आणि पुढील अनावस्था प्रसंग टळेल यासाठी पिक विमा भरण्याकरिता शेतकऱ्यांना मुदतवाढ द्यावी तसेच पीक विम्याचे निकष पूर्वीप्रमाणेच करावेत अशी महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.कृषिमंत्री यांना कळकळीचे विनंती करण्यात येत आहे.

# पोलिस प्रशासनास मनमोकळेपणाने आपले काम करू द्यावे : पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे

**केज । प्रतिनिधी**

केज येथून अमर राजाभाऊ देडे या व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडल्यानंतर केज पोलिस स्टेशनला यासंबंधीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.



दहा दिवस उलटून गेल्यामुळे मुलीचा व सबंधित व्यक्तीचा ठावठिकाणा मिळत नसल्यामुळे तपास कशा पद्धतीने सुरू आहे याची विचारपूस करण्यासाठी ३१ जुलै रोजी मुलीच्या नातेवाईकांनी केज पोलिस स्टेशनला मोठ्या संख्येने हजेरी लावली असता, पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे साहेबांनी आपल्या कर्मचाऱ्यांना काही निर्देश दिले. दररोज नियमित तपास करणे, उत्कृष्ट पद्धतीने तपास मार्गी लावणे, पीडितेच्या नातेवाईकांबद्दल सहानुभूती असणे, फक्त ब्लड रिलेशनच्या व्यक्तींनाच तपासाची नियमित माहिती देणे आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे अशा परिस्थितीत इत्तर लोकांनी येऊन राजकीय भाषेत पोलिस कर्मचाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास पोलिस प्रशासनाला मुक्तपणे काम करण्यास अडथळे निर्माण होत असून अशा प्रकारचे अडथळे निर्माण होऊ नयेत याची सर्वांनी काळजी घ्यावी व सहकार्याच्या भावनेतून पोलिस प्रशासनास मनमोकळेपणाने आपले काम करू द्यावे, असे आवाहन देखील केले.

# भविष्यात या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यात येणार : आ.विजयसिंह पंडित

## शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने मला आशिर्वाद देऊन विधानसभेत काम करण्याची संधी दिली, त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. केवळ राजकारण न करता टिपरे महोत्सवा बरोबरच विविध उपक्रम राबवून गेवराईची संकृती जतन करण्याचे काम करण्यात येत आहे. भविष्यात या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे असे प्रतिपादन महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचे उद्घाटन बुधवार दिनांक ३० जुलै रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मांडुरके, नायब तहसीलदार सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरु, पोलिस निरीक्षक संतोषकुमार बांगर, सहायक पोलिस निरीक्षक संतोष जंजाळ, सहायक पोलिस निरीक्षक कोटकर, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, यांच्यासह परिक्षक सर्वश्री ॲड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते आणि संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला गेवराई येथील पारंपरिक टिपरी आणि सोंग महोत्सव हा सांस्कृतिक वारसा सक्षमपणे चालविण्यासाठी व ही परंपरा जतन करून टिपरे व सोंग या कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरातील ज्येष्ठ रंगकर्मी आणि तरुण कलावंताना सोबत घेऊन बुधवार दि.३० जुलै रोजी सायं ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे टिपरे आणि सोंगस्पर्धेचे भव्यदिव्य आयोजन केले होते. विजयसिंह पंडित यांनी शिस्तबद्ध नियोजन करून हा टिपरे महोत्सव यशस्वी केला. टिपरे महोत्सवात गेवराई शहरातील महिलांसाठी भोलोबा (फेर) गित आणि नागमंत्री स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी टिपरे महोत्सव पाहण्यासाठी गेवराई शहरातील लहान मुले, मुली, महिला, तरुण आणि वयोवृद्ध जनतेने उत्सफुर्त गर्दी केली होती. सायंकाळी सात वाजता स्पर्धेचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थिती करण्यात आला. यावेळी ॲड सुभाष निकम यांनी स्पर्धेचे नियम आणि सुचनांची परिक्षक सुभाष निकम यांनी माहिती दिली. आ. विजयसिंह पंडित यांनी हा टिपरे महोत्सवात सातत्य राखून आयोजन केल्यामुळे कलाकारांना उर्जा मिळाली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने हा टिपरे महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. टिपरे स्पर्धेत ११ संघ तर भोलोबा स्पर्धेत ६ संघ आणि नागमंत्री स्पर्धत दोन सघ सहभागी झाले अशी माहिती त्यांनी दिली. टिपरे स्पर्धेची सुरुवात शिवनेरी संघाने केली. यावेळी विविध मान्यवर आणि पदाधिकारी कार्यकर्ते, महिला, पुरुष, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT